# नागपुर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपुर.


दिनांक 16/06/2020 (मंगळवार)
(सकाळ)

## घरफोडी

पो.स्टे. खापरखेडा :– अंतर्गत 10 कि.मी अंतरावर मौजा लौणखैरी येथे दिनांक 10/06/2020 ते दिनांक 13/06/2020 चे 14:00 वा. ते 10:00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– नारायण संपतराव शेवाळे, वय 72 वर्ष, रा. प्लॉट नं 96, अमर ज्योती नगर, नारा रोड, नागपुर यांचे बंद घराचे दाराचे अज्ञात आरोपीने कुलूप तोडुन घराचे आत प्रवेश केले. यानंतर आरोपीने फिर्यादीच्या घरातील ईलेक्ट्रीक मोटर कि 12,000/–रू., 5 एच पी ईलेक्ट्रीक मोटार पाणी पंप कि. 6,000/–रू. 2 एचपी ओपन वेल ईलेक्ट्रीक मोटर कि 4,000/–रू. व इतर साहीत्य कि. 36,000/–रू. तसेच बाजुचे शेतातील राजेश खापेकर यांच्या शेतातुन 1.5 एच पी समर बिल पंप कि 10,950/– रू., 0.5 एच पी मोटार पंप कि 3,500/–रू. व इतर साहीत्य असा एकुण 25,300/– रू. चा तसेच नारायण शेवाळे याचे शेतातील शेती उपयोगी सामान असा एकुण कि. 61,300/–रू. चा मुद्येमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम 454, 457, 380 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार बंडु कोकाटे 9822943605 हे करीत आहे.

## जबरी संभोग

पो.स्टे. काटोल :– ऑक्टोबर, नोव्हेंबर 2018 ते 14 जानेवारी 2020 दरम्यान आरोपी नामे– प्रभाकर उर्फ प्रफुल भिमराव खवसे, वय 30 वर्ष, रा. मुर्ती याने 19 वर्षीय पिडीत/फिर्यादी हि अल्पवयीन असतांना तिच्या सोबत सन 2017 पासुन प्रेम संबध प्रस्थापीत केले. तसेच आरोपीने पीडितेस लग्नाचे आमीष दाखवुन सन 2018 पासुन तिच्यावर वारंवार तिच्या इच्छेविरूद्ध शारीरिक संबंध केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम 376 (1), 376(2)(जे), 376(2)(एन) भादंवि. सहकलम 4, 6 बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक श्री. सोनाली जगताप 8421401099 या करीत आहे.

## विनयभंग

पो.स्टे. भिवापुर :– दि. 14/06/2020 चे 20:00 वा. सुमारास फिर्यादी/पीडिता यांची 17 वर्षीय पिडीत मुलगी हिच्या घरी आरोपी नामे– राजेश उर्फ मुन्ना कांबळे, रा. मनिष नगर, उर्वेला कॉलनी वर्धा रोड, नागपूर याने प्रवेश केले. यानंतर आरोपीने 17 वर्षीय पीडितेचे हात पकडून जबरदस्तीने कार मध्ये चल म्हणत असता फिर्यादीने त्यास हटकले. यावरून आरोपीने पीडितेस मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला. दरम्यान फिर्यादीचे पती आले व आरोपीला हटकले असता फिर्यादीचे पतीला सुद्धा आरोपीने हातबुक्कीने मारहाण करून जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. भिवापुर येथे आरोपीविरुध्द कलम 354, 354(अ), 323, 506 भादंवि. सहकलम 6 बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनि श्री शरद भस्मे 9764946808 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर